४० वे नाशिक जिल्हा स्तरीय विज्ञान प्रदर्शन दि.३०/१२/२०१४ ते दि.०१/०१/२०१५ पर्यंत ३ दिवस क.का. वाघ शिक्षण संस्था, अमृतधाम, पंचवटी, नाशिक या ठिकाणी महाराष्ट्र शासन (राज्य विज्ञान शिक्षण संस्था, नागपुर) व जिल्हा परीषद (शिक्षण विभाग) नाशिक व विज्ञान अध्यापक संघ यांच्या संयुक्त विद्यमाने संपन्न होत आहे.

एन.सी.ई.आर.टी. नवी दिल्ली यांच्या संदर्भीय पत्रांन्वये विज्ञान प्रदर्शनात जिल्ह्यातील सर्व मान्यताप्राप्त शाळेतील जि.प.शाळा, नगर परिषद शाळा, महानगर पालिका शाळा, खाजगी अनुदानीत व विना अनुदानीत शाळा, आश्रमशाळा, मिशनरी शाळा इ. पुढील दोन गटात विद्यार्थी सहभाग नोंदवितात. १. प्राथमिक स्तर (इयत्ता ८ वी पर्यंत) २. माध्यमिक व उच्च माध्यमिक स्तर (इयत्ता ९ वी ते १२) या विद्यार्थ्यांनी त्यांचे मार्गदर्शक शिक्षक आणि शाळेतील प्रयोगशाळा परीचर/सहायक यांच्या मदतीने वरील उपविषयावर आधारीत प्रदर्शनीय वस्तू/प्रतिकृती/वैज्ञानिक प्रकल्प तयार करतात.

वैज्ञानिक विचारांचा प्रसार होणाच्या दृष्टीने कर्मवीर काकासाहेब वाघ शिक्षण संस्था '**दिशा मांगल्याच्या**' ही स्मरणिका मा.श्री.प्रकाश बाळासाहेब वडजे (उपाध्यक्ष तथा सभापती, अर्थ व बांधकाम समिती, जिल्हा परिषद, नाशिक), मा.सौ.किरण पंढरीनाथ थोरात (सभापती, शिक्षण व आरोग्य समिती, जिल्हा परिषद, नाशिक), मा.श्री.दत्तात्रय जगताप (विभागीय अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, नाशिक) व मा.श्री.बाळासाहेब देवराम वाघ (अध्यक्ष, क.का.वाघ शिक्षण संस्था, नाशिक) इ. मान्यवरांच्या शुभहस्ते दिनांक ०१/०१/२०१५ रोजी समारोपप्रसंगी प्रकाशीत होणार आहे.